॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

## NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246

E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/०८

दिनांक : ०९/०५/२०२६

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये, व रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:– शैक्षणिक वर्ष २०२५–२६ रा.से.यो. वार्षिक खर्चाच्या अंकेक्षणा बाबत.**

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम अंतर्गत आपल्या महाविद्यालयाच्या पथकाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून रा.से.यो. चा उद्देश पूर्ण केला त्याबद्दल आपले व आपल्या सर्व सहकारी वृंदाचे हार्दिक अभिनंदन! दरवर्षी प्रमाणे सन २०२५–२६ रा.से.यो.खर्चाचे वार्षिक अंकेक्षण केंद्रीय पध्दतीने मनोहर आयलानी अॅन्ड कंपनी, लातूर, शॉप नंबर १७– पहिला मजला, यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्स, टिळकनगर, अशोका हॉटेल च्या समोर, लातूर यांच्या मार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून सर्व लेखे केंद्रीय पध्दतीने अंकेक्षण करून स्विकारण्यात येणार आहेत. व तसेच ज्या महाविद्यालयांना **PFMS** प्रणालीद्वारे रक्कम प्राप्त झालेली आहे व ज्या महाविद्यालयांना **PFMS** प्रणालीद्वारे रक्कम प्राप्त झालेली नाही अशा सर्व महाविद्यालयांनी लेखे अंकेक्षण करून घेवून विद्यापीठात सादर करावेत. त्यानंतर लेख्यांची माहिती शासनास पाठविण्यात येईल व **PFMS** प्रणालीद्वारे शासनाकडे परत गेलेले अनुदान शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयांना वितरीत करण्यात येईल याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. तसेच अंकेक्षणाची फिस नियमित कार्यक्रमासाठी रू. ७५०/– व विशेष शिबीर कार्यक्रमासाठी रू. ७५०/– असे एकूण रू.१५००/– आहे. **(ऑडीट रिपोर्ट सादर करते वेळी खालील सुचनांचे पालन करूनच दर्शविण्यात आलेल्या सुचने नुसारच ऑडीट रिपोर्ट सादर करण्यात यावे अन्यथा आपल्या महाविद्यालयाचे ऑडिट रिपोर्ट स्विकारल्या जाणार नाही याची सर्व रा.से.यो. कार्यक्रमाधिका–यांनी नोंद घ्यावी व खालील सुचनेत कळविल्याप्रमाणे ऑडीट रिपोर्ट वेळेवर सादर न केल्यास आपल्या महाविद्यालयाचे ऑडीट रिपोर्ट स्विकारले जाणार नाहीत व आपल्या महाविद्यालयास जे अनुदान देण्यात आले आहे त्या अनुदानाची वसुली करण्यात येईल याची नोंद घ्यावी.)**

अंकेक्षणाच्या कार्यक्रमचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | वेळ | स्थळ | महाविद्यालयाची नावे | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| दि. २१ व २२/०५/२०२६ | सकाळी १०.०० ते सांय. ५.०० पर्यंत | स्वा.रा.ती.म विद्यापीठ, नांदेड | नांदेड जिल्हयातील सर्व महाविद्यालये | नांदेड |
| दि.१८/०५/२०२६ | सकाळी १०.०० ते सांय. ५.०० पर्यंत | शिवाजी महाविद्यालय, हिंगोली | हिंगोली जिल्हयातील सर्व महाविद्यालये | हिंगोली |
| दि. १९/०५/२०२६ | सकाळी १०.०० ते सांय. ५.०० पर्यंत | कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी. | परभणी जिल्हयातील सर्व महाविद्यालये | परभणी |
| दि. २५ व २६/०५/२०२६ | सकाळी १०.०० ते सांय. ५.०० पर्यंत | दयानंद कला महाविद्यालय, लातूर | लातूर जिल्हयातील सर्व महाविद्यालये | लातूर |

–२–

**<u>सुचना:— बॉईंडींग करून ऑडीट रिपोर्ट सादर करतांना खालील क्रमानेच कागदपत्रे सादर करणे व रा.से. यो. संहिते नुसार खालील कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे.</u>**

**अ) नियमीत कार्यक्रम :—** १) उपयोगीता प्रमाणपत्र झेरॉक्स कॉपी साक्षांकीत करून जोडणे २) रिसिप्ट ॲन्ड पेमेंट स्टेटमेंट झेरॉक्स कॉपी साक्षांकीत करून जोडणे ३) प्रपत्र—अ ४) खर्चाचे विवरण ५) २४० तास काम केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र—ड) ६) प्रपत्र—इ ७) संक्षीप्त अहवाल ८) कृती कलर फोटो. ९) वृतपत्रातील बातमी कात्रणे १०) खर्च पावती संग्रह ११) अर्धवार्षिक अहवाल (व्दितीय सत्र) १२) ZBSA खात्याचे बॅक स्टेटमेंट्स.

**ब) विशेष शिबीर कार्यक्रम:१) कॉलेज कव्हरींग लेटर** २) उपयोगीता प्रमाणपत्र झेरॉक्स कॉपी साक्षांकीत करून जोडणे ३) रिसिप्ट ॲन्ड पेमेंट स्टेटमेंट झेरॉक्स कॉपी साक्षांकीत करून जोडणे ४) खर्चाचे विवरण ५) विशेष शिबीर प्रस्ताव ६) ग्रामपंचायत ठराव मूळ कॉपी ७) २४० तास काम केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र--ड) ८) शिबीरातील विद्यार्थ्यांचे स्वाक्षरीचे हजेरी पत्रक विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी केलेले ९) खर्चाचे पावती संग्रह झेरॉक्स १०) फोटो कलर मध्ये ११) ZBSA खात्याचे बॅक स्टेटमेंट्स. तसेच कॅशबुक, लेझर बुक, चिकट बुक, स्टॉक रजिस्टर इत्यादी सोबत घेवून येणे तसेच सर्व कागदपत्रांची पूर्तता करणे वेळापत्रकाप्रमाणे लेखे सादर करणे अनिवार्य आहे.यानंतर कोणत्याही परिस्थितीत सन २०२५—२६ या वर्षाचे लेखे स्विकारण्यात येणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी तसेच प्रवास खर्च नियमित कार्यक्रम अनुदानातून देय राहील. नियमित कार्यक्रमाचे लेखे व अहवाल दि. **१० जून २०२६** पूर्वी विद्यापीठातील रा.से.यो.विभागात सादर करणे आवश्यक आहे. आपण सादर केलेले लेखे व अहवाल महाराष्ट्र शासन रा.से.यो. कक्षाकडे **१५ जून २०२६** पूर्वी पाठवणे आवश्यक असून त्यानंतर आलेले अहवाल स्विकारले जाणार नाहीत याची सर्वस्वी जवाबदारी आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांची राहील यांची नोंद घेण्यात यावी, ही विनंती.

**डॉ. मारोती गायकवाड**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

<u>प्रत माहितीस्तव:</u>
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

<u>प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:</u>
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.